REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ३, सप्टेंबर १९४१ | अंक ३६

अर्थ ग्रन्थमाला—पुस्तक ४ थें

## सहकार

### ( हिंदी सहकारी संस्थांचा संसार )

★

ह्या पुस्तकांत सहकारी संघटनाचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन सांगोपांग केलें आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांचें स्वरूप व कार्य ह्यांची माहितीहि वाचकांस सुबोध रीतीनें मिळेल, अशी त्यांत व्यवस्था आहे. सहकाराच्या शिक्षणक्रमांत आणि पतपेढ्या, बँका इत्यादि संस्थांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांस तें उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. किंमत २ रुपये. ट. ख. निराळा.

**लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे**

★

## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

**बँकांस सुटी**

गुरुवार, ता. ४ व शुक्रवार, ता. ५ सप्टेंबर रोजीं पारशी वर्षारंभानिमित्त बँका बंद रहातील.

**मि. मेंझिस**

आस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान मि. मेंझिस ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला असला, तरी नवे मुख्य प्रधान, मि. फॅडन, ह्यांचे नेतृत्वाखालीं प्रधान-मंडळांत ते काम करणार आहेत.

**शत्रुपक्षीय आगबोटी**

दक्षिण अमेरिकेंतील २१ देशांनीं त्या देशांचे बंदरांत आश्रयास आलेल्या शत्रुपक्षीय शंभर आगबोटींचा उपयोग माल वहातुकीकडे करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटिश सरकारनें त्यास कांहीं अटींवर संमति दिली आहे.

**रेल्वेजचें सरकारी नियंत्रण**

ग्रेट ब्रिटनमधील सर्व रेल्वेजचें नियंत्रण सरकारनें स्वतःकडे घेतलें आहे.

**कोळशाच्या पुरवठ्याची तरतूद**

ब्रिटिश कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कित्येक कामगारांनीं इतरत्र जास्ती वेतनावर काम पत्करलें आहे, त्यांस परत खाणींत पाठविण्यांत येणार आहे. कोळशाचा तुटवडा पडूं नये ह्यासाठी ही योजना आहे.

**गुमास्ता कायदा**

मुंबई गुमास्ता कायदा, ज्या दुकानांत नोकर नाहीं अशा दुकानांसहि लागू आहे व दुकानाच्या मालकानें रात्रीं ९ च्या पुढें दुकान उघडें ठेवतां कामा नये व इन्स्पेक्टरसाठी व्हिजिट पुस्तक त्यानें ठेवलें पाहिजे, असा मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला आहे.

**३ % १९४१ चे कर्जरोखे**

वरील कर्जरोख्यांची परत फेड ता. १५ सप्टेंबर रोजीं केली जाईल. त्यानंतर कर्जरोख्यांवर व्याजाची आकारणी होणार नाहीं.

**डफरिनवर शिक्षण घेतलेले उमेदवार**

डफरिन बोटीवर शिकून तयार झालेल्या ३५० उमेदवारांपैकी ३४२ उमेदवारांना रॉयल इंडियन नेव्ही, बंगाल पायलट सर्व्हिस, मर्कंटाइल मरीन ह्यांत अगर इतरत्र नोकरी लागली आहे.

**थायलंडकडे जपानी सोनें जाणार**

थायलंडनें जपानकडून सुमारें ३½ कोटि रुपये किंमतीचें सोनें विकत घेण्याचें ठरविलें आहे. हें सोनें आपल्या देशाबाहेर निर्गत होऊं देण्यासाठी जपानी सरकार परवानगी देणार आहे.

**स्विस बँका अधिक पसंत**

दक्षिण अमेरिकेंतील कित्येक जर्मनांनीं आपले पैसे स्वित्सरलंडमध्यें वर्ग केले आहेत. स्वीडनमधील बँकांपेक्षां स्वित्सरलंडमधील बँका जर्मनांस अधिक सुरक्षित वाटतात.

**सरकारी कचेऱ्या**

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्या सिमल्याहून दिल्लीस ता. १३ ऑक्टोबर रोजीं येतील.

**दैनिक कार्यक्रमाची फिल्म**

ग्रेट ब्रिटनचे राजेसाहेब, राणी व त्यांच्या कन्या ह्यांचा दैनिक आयुष्यक्रम चित्रित केलेली एक फिल्म तयार करण्यांत आली आहे, ती लवकरच सर्वांस बघावयास मिळेल.

**हिंदी रेल्वेजचा किफायतशीर व्यवहार**

१९४०-४१ मध्यें हिंदी रेल्वेजच्या कारभारांत १८ कोटि ४६ लक्ष रुपयांचा वाढावा दिसून येत आहे. ह्यापैकी, हिंदुस्थान सरकारास १२ कोटि, १९ लक्ष रुपये मिळतील व बाकीची रकम रेल्वे रिझर्व्ह फंडांत दाखल होईल. १९३८-३९ मध्यें रेल्वेजनीं १ कोटि, ३७ लक्ष रुपयांचा वाढावा दाखविला होता व त्यांच्या १९३९-४० च्या हिशेबांत ४ कोटि, ३३ लक्ष रुपये शिलक राहिले होते.

**अफगाणिस्तानांतील जर्मन लोक**

अफगाणिस्तानांत सुमारें १०० जर्मन लोक आहेत, त्यांपैकीं बहुतेक पब्लिक वर्क्स खातें, साखर व कापड ह्यांचे कारखाने, इत्यादींत आहेत. इराणमध्यें जर्मन लोक महत्त्वाच्या जागांवर आहेत, तशी परिस्थिति अफगाणिस्तानांत नाहीं. अफगाणिस्तान सोडून जाण्यास जर्मनांनीं अद्याप प्रारंभ केलेला नाहीं.

**बॅरिस्टरीची परीक्षा**

१९४१ ची मायकेलमास बार परीक्षा लंडन येथें ऑक्टोबर, १९४१च्या दुसऱ्या आठवड्यांत घेतली जाईल, त्याच वेळीं दिल्ली येथेंहि ती घेण्यांत येईल. ज्या विद्यार्थ्यांनीं अभ्यासक्रम पुरा केला आहे, परंतु ज्यांस युद्धपरिस्थितीमुळें लंडनला जातां येत नाहीं, अशांनाच दिल्ली येथील परीक्षेस बसतां येईल.

**३० हजार शिंपी**

हिंदी सैनिकांसाठी कपडे शिवण्यांत ३० हजार शिंपी गुंतलेले आहेत. युद्धास प्रारंभ होण्याचे आधी ८०० शिंप्यांचें काम पुरें पडत असे.

**पेरूंची प्रतवारी**

पेरूंची प्रतवारी लावण्यासाठी अलाहाबाद जिल्ह्यांत एक केंद्र स्थापन करण्यांत आलें होतें. त्यांत प्रतवारी लावलेल्या पेरूंस सर्वसाधारणपणें ११% अधिक किंमत आली.

**साखर कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचा उपयोग**

साखर कारखाने वर्षांतून अनेक महिने बंद असतात. ह्या वेळांत कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचा युद्धविषयक उत्पादनासाठीं कसा उपयोग करवून घेतां येईल, ह्याचा विचार सप्लाय खातें करीत आहे.

**बॉंबे प्रॉ. को. मार्केटिंग सोसायटी**

वरील सोसायटीच्या स्थापनेची पूर्व तयारी पुरी झाली आहे. सोसायटीच्या योजनेस पाठबळ चांगलें मिळालें आहे.

**आगबोटींचा नाश कमी होत चालला**

ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांच्या बुडालेल्या आगबोटींची संख्या जुलै १९४१ मध्यें जेवढी कमी भरली तेवढी युद्धास प्रारंभ झाल्यानंतर फक्त दोनदांच भरली होती.

**जमीन महसुलाची वसुली**

१९३९-४० मध्यें मुंबई प्रांतांत एकूण ३ कोटि, ७० लक्ष रुपये सारा वसूल झाला. ७९½ लक्ष रुपयांची तहकुबी व २२½ लक्ष रुपयांची सूट देण्यांत आली.

**जुलै महिन्यांतील युद्धप्रयत्न**

जुलै, १९४१ मध्यें पुणें जिल्ह्यांत युद्धफंडास ३,९१५ रुपये व रेडक्रॉस फंडास ३५४ रुपये मिळाले. ३१,५२० रुपयांचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटें खपलीं. ३% डिफेन्स बॉंड्स २ लक्ष, ४½ हजार रुपयांचे खपले. बिनव्याजाचे रोखे २ हजारांचे लोकांनीं घेतले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२२ | ५ युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था | ४२६ |
| २ युद्धाचीं दोन वर्षे पुरीं झालीं | ४२३ | ६ लवादाचा कायदा | ४२७ |
| ३ सहकारी चळवळींत उत्साहवर्धन | ४२४ | ७ विटे मर्चंट्स को. बँक लि. | ४२७ |
| ४ स्फुट विचार ... | ४२५ | ८ कातडीं कमविण्याचा धंदा | ४२८ |
| इराणमध्यें जर्मनीस पायबंद–युरोपांत जर्मनीचा वाढता द्वेष—हिंदी रेल्वेजचें वाढलेलें उत्पन्न. | | ९ सांगली अर्बन को. बँक लि. | ४२९ |
| | | १० मिरज स्टेट बँक लि. | ४२९ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ४३० |



# अर्थ

बुधवार, ता. ३ सप्टेंबर, १९४१


## युद्धाचीं दोन वर्षे पुरीं झालीं

जर्मनीनें पोलंडवर हल्ला करून प्रस्तुत युद्धास प्रारंभ केला त्यास आतां दोन वर्षे झालीं असून तिसऱ्या वर्षास सुरवात झाली आहे. गेल्या दोन वर्षांच्या अखेरीस युद्धपरिस्थितीचा आढावा घेऊन हिटलरशाहीशी लोकशाहीच्या चहात्या राष्ट्रांनीं चालविलेल्या झगड्यास यश येण्यासाठी संयुक्त प्रयत्नांस कोणतें वळण लावण्याची आवश्यकता आहे ह्याचा विचार होणें अगत्याचें आहे. पूर्वतयारीच्या व लढाऊ सामानाच्या भरपूर पुरवठ्याच्या जोरावर जर्मनीनें आपल्या सत्तेचें जूं युरोपांतील आपल्या शेजारच्या राष्ट्रांच्या मानेवर ठेवलें आहे. इंग्लंडवर स्वारी करण्याचा हिटलरचा बेत कल्पना-क्षेत्रांतच अजून राहिला आहे ह्याचें कारण ब्रिटिश लोकांची स्वसंरक्षणाची जय्यत व्यवस्था हें आहे. तसेंच, पूर्व युरोपांत रशियाचा काटा एकदा काढून टाकला असतां इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य ह्यांचा समाचार घेणें सोपें जाईल ह्या विचारानें जर्मनीनें रशियन मोहिमेस प्रारंभ केला. जर्मन फौजांनीं रशियन मुलखांत बरीच प्रगति केली असली आणि त्या लेनिनग्राडच्या जवळ जात असून त्यांनीं युक्रेनमध्यें कांहीं महत्त्वाचीं ठिकाणें घेतलीं असलीं तरी त्यांचें अतिशय नुकसान झालें आहे आणि रशियाचा दम कायम आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियन फौजांनीं व विमानांनीं केलेला निकराचा प्रतिकार स्वतःस विलक्षण हानिकारक झाला असून त्या योगानें आपले रशियाचा पाडाव अल्प काळांत करण्याचे बेत फसले आहेत ह्याविषयींची कबूली जर्मन पुढाऱ्यांस अप्रत्यक्ष रीतीनें द्यावी लागली आहे. रशियन मोहिमेंत जर्मनीचे लक्षावधि सैनिक मृत्यु पावले व कैद झाले आहेत आणि त्याची युद्धसामुग्री अतिशय मोठ्या प्रमाणावर खर्ची पडली आहे. ह्या कारणानें शत्रूचें बळ एकीकडे पुष्कळ कमी झालें आहे तर दुसऱ्या बाजूनें रशियाच्या दोस्तांचें बळ वाढत आहे आणि त्यांचें युद्धसहाय त्यास उपलब्ध होण्याची तजवीज कार्यक्षम रीतीनें होत आहे.

रशियन मोहिमेंत जर्मन शक्ति एकवटली असतां ब्रिटिश वैमानिकांनीं पश्चिम जर्मनी व फ्रान्सचीं बंदरें ह्यांवर हल्ले सारखे चालू ठेवले आहेत. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमार शत्रूच्या जहाजांचा योग्य समाचार घेत असून त्या बाजूस जर्मनी व इटली ह्यांच्या लष्करी हालचालींवर नियंत्रण बसलें आहे. सीरिया, इराक व इराण ह्या देशांत ढवळाढवळ करून तिकडून इंग्लंडला परस्पर शह देण्याचा हिटलरचा डाव सपशेल फसला आहे. जपानची उठावणी करून पूर्व आशियांत व पॅसिफिक महासागरांत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या लढाऊ सामर्थ्यास पायबंद घालण्याचा हिटलरचा प्रयत्न त्या राष्ट्रांनीं वेळींच ओळखून त्याबाबत जय्यत तयारी ठेवली आहे. अमेरिकेनें रशियास सहाय देण्याचें ठरवल्यामुळें आणि इंग्लंडला युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणांत त्या राष्ट्राकडून पुरवली जात असल्यानें जर्मनीच्या योजना लटपटूं लागल्या आहेत. जर्मनी फ्रान्सचा उपयोग स्वतःचा हस्तक म्हणून करूं पहात आहे, पण त्या बाबतींतहि त्यास यश मिळण्याची फारशी आशा नाहीं. एवढेंच नव्हे, तर युरोपांत जर्मनीविरुद्ध असंतोष वाढत चालला असून त्याचा अढयळा सारखा वाढत जाणार आहे. अटलांटिक महासागरांत जर्मनीनें ब्रिटिश व्यापारी जहाजांचा नाश चालवला आहे त्यास अलीकडे बराच आळा बसला आहे आणि ब्रिटिश व्यापाराची नाकेबंदी व इंग्लंडची उपासमार करण्याचा हिटलरचा हेतु साध्य झालेला नाहीं, एवढेंच नाहीं तर प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल यांनीं एकत्र चर्चा करून ठरवलेल्या संयुक्त धोरणाच्या योजनेमुळें स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांत नवीन उत्साह उत्पन्न झाला आहे. आतां रशियन मोहिमेचा जर्मनीस फायदा मिळूं नये आणि त्याचें पाऊल पुढें पडूं नये अशी व्यवस्था झाली पाहिजे. रशियन राष्ट्राचा ह्या संबंधांत निश्चय झालेला असून हिटलरशाहीचा पूर्ण नाश होईपर्यंत तें लढत रहाणार आहे ह्यांत संशय नाहीं. सध्याचें युद्ध खुद्द जर्मनीच्या विरुद्ध उलटवण्याची वेळ लवकरच येत आहे. त्यासाठीं इंग्लंड, अमेरिका व इतर स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रें ह्यांमध्यें युद्धसामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें व वाढत्या प्रमाणावर झालें पाहिजे आणि त्यांनीं सध्यापेक्षाहि अधिक स्वार्थत्याग करणें अगत्याचें आहे ह्या आशयाच्या घोषणा युद्ध तिसऱ्या वर्षांत पदार्पण करीत असतां होत आहेत ह्याचें स्वारस्य लक्षांत येणें अवघड नाहीं. हिटलर आणि मुसोलिनी ह्यांनीं एकत्र येऊन नुकतीच चर्चा केली आणि पुढील युद्धयोजनेचा विचार केला. त्यांचे बेत हाणून पाडण्याचा आजचा एकच मार्ग म्हटला म्हणजे युद्धसामुग्रीचा पुरवठा वाढवणें हा होय असें ब्रिटिश व अमेरिकन पुढारी म्हणत आहेत. त्यांचें धोरण असें आहे कीं जर्मनीच्या लढाऊ शक्तीस ओहोटी लागली आहे' अशा वेळीं हिटलरशाहीच्या प्रतिस्पर्ध्यांनीं आपलें स्वतःचें सामर्थ्य एकवटल्यास युद्धाचें तिसरें वर्ष संपण्यापूर्वीच जर्मनीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा डोलारा ढांसळून जमीनदोस्त होऊं शकेल आणि हिटलरची रशियांतील मोहीम हा त्याच्या पराजयाचा प्रारंभच आहे ह्याविषयीं खात्री पटूं लागेल.

## सहकारी चळवळींत उत्साहवर्धन

सहकारी कार्यांविषयींचा आढावा घेऊन त्याचा प्रचार करण्याच्या हेतूनें दर वर्षी सहकार-दिन साजरा करण्याचा प्रघात हिंदुस्थानांत आणि मुंबई प्रांतांत अस्तित्वांत आहे. हिंदी सहकारी समित्यांचें अखिल भारतीय मध्यवर्ती मंडळ आहे त्याचेकडून प्रतिवर्षी ह्या बाबतींत संदेश येतो आणि तो ठिकठिकाणीं सभा भरवल्या जातात त्यांत वाचला जातो आणि त्या प्रसंगाच्या निमित्तानें चर्चा व भाषणें होण्याची वहिवाट चोहोकडे प्रस्थापित झाली आहे. अलीकडे आमच्या इकडे सहकार दिनानिमित्त समारंभ, सभा व भाषणें होण्याच्या बाबतींत थोडेसें शैथिल्य आलेलें आहे. तें नाहींसें होऊन सहकारी चळवळीस सहकार दिनाच्या सहायानें प्रोत्साहन मिळावें ह्या कल्पनेनें असिस्टंट रजिस्ट्रार, श्री. भागवत, ह्यांनीं सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची व इतर निमंत्रितांची एक सभा गेल्या शनिवारीं बोलावली होती ती पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष, श्री. भोंडे वकील, ह्यांचें अध्यक्षतेखाली भरली होती. सभेस अनेक ठळक कार्यकर्ते उपस्थित होते.

सहकारी चळवळींत अधिक कार्यकर्त्यांनीं लक्ष घालावें आणि तिच्या संबंधांत योग्य प्रचार व्हावा ह्यासाठी यंदाचा सहकार दिन व्यवस्थित रीतीनें पार पाडण्याच्या कार्याकरितां एक प्रातिनिधिक समिती नेमावी अशी सूचना असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांनीं चर्चेसाठी सभेपुढें मांडली, तिच्यावर अनेक भाषणें झालीं. बिनसरकारी कार्यकर्त्यांनीं पुढें येऊन सहकारी चळवळी बाबत जनतेंत उत्साह निर्माण करावा आणि तिला नवीन चालन द्यावें आणि त्या कामांत सहकारी खातें व सरकार सहाय देईल असा श्री. भागवत ह्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता. सहकार दिन साजरा करण्यासाठी सभेनें एक समिति नेमावी ह्या त्यांच्या योजनेच्या मुळाशी वर निर्दिष्ट केलेला हेतु मुख्यत्वेंकरून होता हें झालेल्या चर्चेत त्यांनीं स्पष्ट केलें. सभेस जमलेल्या निमंत्रित मंडळीच्या वतीनें विचार प्रदर्शित करण्यांत आले त्यांत सहकार दिनाचें महत्त्व व तो साजरा करण्याची आवश्यकता ह्यांचे बाबतींत असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांशीं ऐक्यमत्य असलेलें दिसून आलें. सहकार दिनाचे बाबतींत पूर्ण सहकार्य करण्याची तयारी सर्वांनीं दर्शविली. नियोजित कार्य करण्याच्या पद्धतिसंबंधानें मात्र तीव्र मतभेद प्रकट करण्यांत आला.

बहुतेक वक्त्यांनीं खालील बाबींवर विशेष जोर दिला. (१) सहकार दिन मामुली रीतीनें व औपचारिक रीतीनें साजरा करण्यापासून विशेष कार्यभाग साधण्यासारखा नाहीं. तें काम पुण्यांतले सहकारी कार्यकर्ते सहज करूं शकतील आणि त्यासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता नाहीं. (२) प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची जिल्हा शाखा बंद झाल्याकारणानें प्रचार करणारी स्थायी व अधिकारी संस्था राहिलेली नाहीं, पण तिच्या जागीं इन्स्टिट्यूटचें कार्य करणारी सुपरवायजिंग युनिअन्सचें जिल्हा बोर्ड ही संस्था आली असल्यानें तिनेंच प्रचाराची व सहकार दिन साजरा करण्याची योजना हातीं घ्यावी. बोर्डाशीं सर्व प्रकारचें सहकार्य जिल्ह्यांतील सहकारी संस्था आनंदानें करतील. (३) सहकार दिन हेंच केवळ कार्याचें ध्येय असूं नये. विधायक व सतत होणाऱ्या कार्याचा तो विशेष व नैमित्तिक भाग समजला जावा. इन्स्टिट्यूटची घटना आणि त्याच्या कार्याचें स्वरूप व व्याप ह्यांविषयीं निश्चित योजना सरकारनें अजून मान्य केलेली नाहीं. त्या संबंधांत पुढें काय होणार असेल तें होवो, त्याविषयीं वाद घालीत न बसतां आहे त्या परिस्थितींत सुपरव्हायजिंग युनिअन्सच्या जिल्हाबोर्डानें विधायक कार्याचा उपक्रम करून योग्य वाटतील त्या बिनसरकारी कार्यकर्त्यांचें सहाय घ्यावें.

सहकार दिन ही प्रचाराची एक चांगली संधि आहे ह्यांत वाद नाहीं. पण ती साधली जाऊन सहकारी अधिकारी आणि बिनसरकारी प्रातिनिधिक व इतर कार्यकर्ते ह्यांच्यां सहकारानें भरीव व सतत अमलांत रहाणारी कार्ययोजना हातीं घेण्याचा उपक्रम झाल्यास तें सर्वस्वीं इष्ट होईल असें सभेचें मत पडलें. हा उपक्रम करण्यास युनिअन्सचें जिल्हाबोर्ड ही स्थायी संस्था आहे ती केवळ सहकार दिनासाठी निवडलेल्या समितीपेक्षां केव्हांहि अधिक योग्य असल्यानें त्या बोर्डानें सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांचें सहाय घ्यावें आणि स्वतःची समिति नेमून तिच्या विद्यमानें कार्यास लागावें ही कित्येक वक्त्यांनीं केलेली सूचना अखेर सभेनें सर्वानुमतें मान्य केली. असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांच्या नेतृत्वाखालीं जिल्हा बोर्डाची पंच मंडळी सभेंतील चर्चेच्या अनुरोधानें उपयुक्त कार्याचा उपक्रम करील अशी आशा आहे. गेल्या शनिवारच्या सभेंत कांहीं तीव्र मतभेद स्पष्ट दिसून आला व व्यक्त झाला तरी एकंदरीनें खेळीमेळीचें वातावरण होतें आणि चर्चा सहकारी मित्रत्वाच्या वृत्तीनें झाली. ह्याविषयीं निमंत्रित प्रतिनिधी, कार्यकर्ते, सभेचे अध्यक्ष व असिस्टंट रजिस्ट्रार साहेब ह्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. मतभेदाच्या बाबींपेक्षा मतैक्याच्या गोष्टींकडेच अधिक लक्ष देण्याची सूचना सभेचे अध्यक्ष श्री. भोंडे ह्यांनी केली आणि श्री. भागवत ह्यांनीं चर्चेत खेळाडू वृत्ति दाखवली व सभेंतील बहुमतास मान दिला, ह्या कारणानें सभेचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडला हें येथें नमूद केलें पाहिजे.

---

### राष्ट्रीय प्रार्थनादिन

युद्धास प्रारंभ झाल्यास दोन वर्षें पुरीं झाल्यानंतरचा पहिला रविवार ता. ७ सप्टेंबर रोजीं येतो. तो दिवस हिंदुस्थानांतील सर्व धर्मीयांनीं ब्रिटिश लोकांप्रमाणेंच राष्ट्रीय प्रार्थनादिन म्हणून पाळावा, अशी व्हाइसरॉयांनीं विनंति केली आहे.

### वेड्यांच्या इस्पितळांतील व्यथितांची संख्या

मुंबई प्रांतांतील वेड्यांच्या इस्पितळांतील व्यथितांची रोजची सरासरी संख्या १९४० सालीं ३,६३६ भरली. त्यांत २,४७३ पुरुष व १,१६३ स्त्रिया होत्या.

---


## दि कराड अर्बन को-ऑ. बँक लि. कराड

## नोटीस

कराड अर्बन को-ऑ-बँकेच्या भागीदारांची चोविसावी वार्षिक साधारण सभा रविवार ता. १४।९।४१ रोजीं सकाळीं ८ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. सन १९४०–४१ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे तीन सभासदांची निवडणूक करणें व पोटनियम दुरुस्ती मंजूर करणें वगैरे कामे सदर वेळीं होणार आहेत. तरी सर्व सभासदांनी सभेस अगत्य यावें. कळावें.

कराड, तारीख १०–८–४१

व्ही. पी. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### इराणमध्यें जर्मनीस पायबंद

लहान देशांत त्यांस तज्ज्ञांची मदत देण्याच्या निमित्तानें आपलीं माणसें पेरून त्यांच्याकरवी तेथें फंदफितुरी करावयाची आणि ते देश स्वतःच्या काबूंत आणून ठेवावयाचे ही जर्मनीची युद्धनीति आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. ह्या धोरणास युरोपमध्यें यश आल्याकारणानें त्याचा प्रयोग इराणमध्यें करण्याचा हिटलरचा प्रयत्न चालू होता. ह्या संबंधांत ब्रिटिश मुत्सद्दी धोक्याची सूचना देत आले आहेत. सीरिया व इराक ह्या देशांत ब्रिटिश फौजांनीं जर्मनीच्या गुप्त कारवायांचा वेळींच प्रतिकार केला नसता तर एशियाच्या पश्चिम भागांत त्या देशाचें प्रस्थ पसरलें असतें. रशियांत जर्मनीची मोहीम चालली आहे, तिला मदत म्हणून इराणमध्यें ढवळाढवळ करण्याचा आणि तेथील तेलाच्या पुरवठ्यावर ताबा मिळवण्याचा हिटलरनें व्यूह रचला होता. त्या संबंधांत इंग्लंडनें इराणी सरकारास अनेक वेळां भयसूचना दिली होती. तज्ज्ञांचें पांघरूण घेऊन इराणमध्यें कारवाया करणाऱ्या जर्मनांस काढून टाकणें इष्ट आहे असें त्या सरकारास कळवण्यांत आलें असतां त्या संबंधांत त्यानें उडवाउडवच केली, ह्या कारणानें अखेर रशिया व इंग्लंड ह्यांस आपल्या फौजा इराणमध्यें पाठवून तेथील राकेलच्या विहिरी व इतर मान्याचीं ठिकाणें आपल्या संरक्षणाखालीं घेणें प्राप्त झालें आहे. उत्तरेच्या बाजूनें रशियाचें सैन्य आणि दक्षिण व पश्चिम ह्या बाजूंनीं ब्रिटिश फौजा इराणमध्यें चालून गेल्या आहेत. इराणचें स्वातंत्र्य व इराणचा मुलूख हीं अबाधित रहातील असें आश्वासन इंग्लंड व रशिया ह्यांनीं इराणी सरकारास दिलें आहे आणि इराणचा उपयोग प्रस्तुत युद्धांत जर्मनीस करतां येऊं नये अशी व्यवस्था काय ती आपणांस करावयाची आहे असें त्यास त्यांनीं कळवलें आहे. आपला इराणमधला डाव फसला ह्याविषयीं जर्मनीस अर्थातच विषाद वाटत असून त्यासंबंधांत दुसऱ्या हिकमती लढवण्याचे हिटलरचे प्रयत्न चालू होणार ह्यांत संशय नाहीं. तथापि, इराणमध्यें घडाडीचें धोरण अवलंबल्याबद्दल इंग्लंड व रशिया ह्यांचें चोंहोंकडे अभिनंदनच होईल. त्या योगानें तीन-चार महत्त्वाचे हेतु साध्य झाले आहेत. पश्चिम एशियांत जर्मनीस पायबंद बसला आहे ही पहिली गोष्ट आहे. हिंदुस्थानच्या संरक्षणास त्यानें मदत झाली आहे ही दुसरी बाब आहे. रशियास युद्धसामुग्री पुरवण्याचा सुरक्षित मार्ग त्यामुळें मोकळा झाला आहे हाहि येथें महत्त्वाचा परिणाम आहे. इराणमधील तेलाचा पुरवठा निश्चित होऊन रशियाची पिछाडीची बाजू बळकट बनली आहे हा मोठा फायदा आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. इराणी सरकारनें वेळींच जागें होऊन इंग्लंड व रशिया ह्यांच्यांशीं सहकार्य करणें त्या देशाच्या व इतरांच्या हिताचें आहे ही गोष्ट त्यास पटेल असा भरंवसा वाटतो. आपल्या फौजांस न लढण्याविषयीं हुकूम इराणी सरकारनें काढले असून इंग्लंड व रशिया ह्यांनीं सुचवलेल्या व्यवस्थेच्या अटी मान्य करण्याची त्याची तयारी आहे हें ह्या परिस्थितीचें निदर्शक आहे.

---

### युरोपांत जर्मनीचा वाढता द्वेष

जर्मनीनें युरोपांतील ज्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य पायाखालीं तुडवलें आहे, त्यांमधील लोकांमध्यें हिटलरशाहीविषयीं वसत असलेला तिटकारा सुप्तावस्थेंत असला तरी तो तसाच फार वेळ टिकूं शकत नाहीं. त्या राष्ट्रांत जर्मनीची सत्ता दंडुक्याच्या जोरावर स्थापन झाली आणि त्याच जोरावर ती टिकवण्यांत येत आहे. त्यांची आर्थिक स्थिति हलाखीची झाली आहे. आपणांस युद्धासाठीं लागणारा कच्चा पक्का माल जर्मन सरकार पादाक्रांत केलेल्या देशांतून उचलून नेत आहे आणि तेथील लोकांस आचार-विचार, भाषण ह्यांचें कांहींच स्वातंत्र्य उरलेलें नाहीं. त्यांतला असंतोष जर्मनीनें दाबून टाकण्याचा प्रयत्न केला तरी तो आंत धुमसत आहे आणि संधि मिळतांच तो पेट घेतल्यावांचून राहावयाचा नाहीं हें निश्चित आहे. फ्रान्समध्यें व्हीशीचें सरकार जर्मनीच्या ताटाखालचें मांजर बनलें आहे आणि आपल्या लोकांचा मधून मधून डोकें वर काढणारा असंतोष क्रूरपणानें हाणून पाडीत आहे. लाव्हाल हे जर्मनीचे हस्तक बनल्यामुळें ते व त्यांचे सहकारी ह्यांच्या विरुद्ध फ्रेंच जनता सत्रळत चालली आहे. लाव्हाल व त्यांचे साथीदार ह्यांवर नुकत्याच गोळ्या झाडण्यांत आल्या तो प्रसंग ह्या वाढत्या असंतोषाचा निदर्शक आहे. फ्रान्सच्या स्वातंत्र्याचे चहाते हे राष्ट्राचे शत्रू आहेत असें भासवून व्हीशी सरकारानें आपल्या बाजूस नसलेल्या लोकांवर दडपशाहीचें शस्त्र उचललें आहे. जर्मनीच्या विरुद्ध युरोपांत चोहोंकडे द्वेष पसरला आहे तो धुमसत आहे आणि त्याच्या ज्वाला लवकरच भडकणार व पसरणार असा रंग दिसत आहे. रशियन मोहिमेंत जर्मनीचें भयंकर नुकसान होत आहे ती आपत्ति नात्सी पक्षास आपल्या लोकांपासून झाकून ठेवणें कठीण आहे. ब्रिटिश व रशियन विमानांचे जर्मनींतील महत्त्वाच्या शहरांवर हल्ले चालले आहेत त्यांचा कटु अनुभव ह्या लोकांस तर प्रत्यक्षच येत आहे. हिटलरशाहीस आंतून व बाहेरून अशी दुहेरी कात्री लागल्यानें तिचा शेवट जवळ येत चालला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मागें इराकमध्यें व आतां इराणांत जर्मनीस चांगली थप्पड बसली आहे तिचाहि परिणाम त्याच प्रकारचा झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

---

### हिंदी रेलवेजचें वाढलेलें उत्पन्न

हिंदी रेलवेजचे १९४०-४१ सालचे हिशेब पुरे झाले आहेत त्यांवरून सदरहू वर्षांत त्यांस निवळ उत्पन्न मोठ्या प्रमाणांत मिळालें असल्याचें दिसून येतें. माणसांच्या व मालाच्या वहातुकीचे रेलवेजचे दर वाढविण्यांत आले असून युद्धपरिस्थितीमुळें त्यांवरील ने-आण वाढली आहे. ह्या कारणांमुळें रेलवेजच्या उत्पन्नांत वाढ होणें स्वाभाविक आहे. १९४०-४१ सालीं हिंदी रेलवेजच्या खर्चापेक्षा उत्पन्न १८ कोटि ४६ लक्ष रुपयांनीं अधिक झालें आहे. मध्यवर्ती पब्लिक अकौंटस कमिटीस ह्या बाबत माहिती देण्यांत आली आहे. उत्पन्नांतल्या ह्या वाढाव्याची वाटणी रेलवेजचा रिझर्व्ह फंड व हिंदुस्थान सरकार ह्यांचे दरम्यान विशिष्ट प्रमाणांत व्हावयाची असते. त्या व्यवस्थेस अनुसरून वरील वाढाव्यापैकीं हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस १२ कोटि, १९ लक्ष रुपये मिळतील आणि बाकीची रकम रेलवेजच्या रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येईल. सध्याच्या युद्धपरिस्थितींत मध्यवर्ती सरकारच्या तिजोरींत उत्पन्नाची जेवढी भर पडेल तेवढी इष्टच आहे. १९३८-३९ सालीं हिंदी रेलवेजच्या उत्पन्नांत १ कोटि ३७ लक्षांची शिल्लक राहिली होती, ती १९३९-४० मध्यें ४ कोटि ३३ लक्ष रुपयांवर गेली. १९४०-४१ सालीं हा आकडा १८ कोटि ४६ लक्ष रुपयांपर्यंत चढला आहे. ह्या तुलनात्मक आकड्यांवरून हिंदी रेलवेजच्या उत्पन्न-खर्चाच्या परास्थितीवर बोधदायक प्रकाश पडत आहे.

## युद्ध आणि हिंदुस्थानची आर्थिक व्यवस्था

### प्रो. काळे ह्यांनीं मुंबईच्या रेडिओवरून केलेलें भाषण

( ऑल इंडिया रेडिओ, मुंबईचे डायरेक्टर ह्यांच्या परवानगीनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. )

परराष्ट्रीय व्यापाराची स्थिति ह्या प्रमाणें होती तरी लंडनवरील पौंड स्टर्लिंगमधल्या हुंड्या मिळण्यास रिझर्व्ह बँकेस कांहींच अडचण भासली नाहीं आणि हुंडणावळीचा दर सबंद वर्षभर स्थिर राहिला. हिंदुस्थान सरकार आणि ब्रह्मदेशचें सरकार ह्यांस सुमारें २¾ कोटि पौंड लंडनला आपलें तेथील देणें भागवण्यासाठी पाठवावयास हवे होते. परंतु ब्रिटिश सरकाराच्या वतीनें हिंदुस्थान सरकार ह्या देशांत पैसा खर्च करीत आहे त्याची रक्कम सुमारें ४¾ कोटी पौंडाचे वर झाली आणि ती त्या सरकाचे खात्यावर लंडनमध्यें जमा झाली. त्यामुळें सुमारें २½ कोटी पौंड वरील दोन सरकारांच्या स्टर्लिंगमधील देण्यापेक्षा अधिक तेथें शिल्लक राहिले. देण्या-घेण्याच्या व्यवहारांत हिंदुस्थानचें परराष्ट्रांकडून येणें निघतें त्याचा उपयोग युद्धसामुग्रीच्या परराष्ट्रीय खरेदीसाठी मुख्यत्वें करून व्हावा म्हणून हिंदुस्थान सरकार व रिझर्व्ह बँक यांनीं परराष्ट्रीय हुंड्यांच्या खरेदी विक्रीवर कडक नियंत्रण घातलें आहे. अमेरिकेवरील डॉलर हुंड्यांचे बाबतींत त्या देशांत होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील खरेदीच्या किमतीची भरपाई करण्यास सुलभ जावें या हेतूनें विशेष खबरदारी घेण्यांत आली आहे.

ब्रिटिश सरकारासाठी हिंदुस्थान सरकार त्या देशांत खर्च करीत आहे, त्याची फेड लंडनमध्यें होत असल्यानें रिझर्व्ह बँकेच्या पौंड स्टर्लिंगमधल्या तिकडील शिलका वाढल्या त्यांपैकी कांहीं लंडनमध्यें अल्प मुदतीनें गुंतवण्यांत आल्या. ही गुंतवण गेल्या सालअखेर १६४ कोटी रुपयांपर्यंत गेली आणि मध्यंतरीं गेल्या मार्चमध्यें तिचा आकडा २१७ कोटी रुपयांवर चढला. रिझर्व्ह बँकेच्या त्या लंडनमधील मोठ्या शिलकेचा उपयोग हिंदुस्थान सरकारचें पौंड स्टर्लिंग मधलें मुदतीचें कर्ज फेडून टाकण्याकडे करतां आला ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट गेल्या वर्षी घडली. बँकेनें ८८ कोटी रुपये किमतीइतकी पौंडांतली रक्कम हिंदुस्थान सरकारास कर्जफेडीसाठी सहज दिली तरी तिची लंडनमधील शिल्लक मोठ्या प्रमाणांत राहिली आहे. आतांपर्यंत १३४ कोटी रुपये किमतीचें पौंडातलें हिंदुस्थान सरकारचें कर्ज फेडण्यांत आलें आहे आणि त्याच्या जागीं हिंदुस्थानांतील कर्ज रोख्यांची अदलाबदल करण्यांत आली आहे ती त्या देशास फायदेशीर आहे.

### जनतेचा सरकारी रोख्यांवरील विश्वास

जून १९४० मध्यें हिंदुस्थानांतील सरकारी कर्ज रोख्यांच्या किंमती घटल्या परंतु त्या हळूहळू सुधारत गेल्या आणि एकंदरीनें त्या रोख्यांचे भाव वर्षभर चढीचे राहिले. साडेतीन टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटेची किंमत ८५ रुपयेपर्यंत उतरली होती ती अखेर ९६ रुपयांवर चढली. नाणें बाजारांत पैशाचा पुरवठा भरपूर राहिला आणि सरकारनें काढलेल्या कर्जास लोकांकडून चांगला आश्रय मिळाला. जनतेचा सरकारी रोख्यांवरचा विश्वास १९४०–४१ मध्यें कसा कायम राहिला हें पोस्टल कॅश सर्टिफिकिटांच्या व्यवहारांवरून दिसून येतें. १९४० सालाच्या मे ते जुलै ह्या महिन्यांत कॅश सर्टिफिकिटांचे ६½ कोटि रुपयांचे वर पैसे परत द्यावे लागले आणि सर्टिफिकिटांतली नवी गुंतवण घटली. तथापि, जुलै महिन्यानंतर स्थिति सुधारली. पूर्वीचे वर्षाचें मानानें कॅश सर्टिफिकिटांची १९४०–४१ मधील विक्री बरीचशी कमी झाली तर दहा वर्षे मुदतीचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स जून १९४० मध्यें काढण्यांत आलीं आणि १९४१ मार्च अखेर सुमारें २½ कोटि रुपयांच्या ह्या सर्टिफिकिटांचा खप झाला. पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेच्या व्याजाचा दर दीड टक्का सबंध वर्षभर कायम होता. १९४० च्या मे–जून महिन्यांत ह्या बँकेंतून ठेवी मोठ्या प्रमाणांत काढण्यांत आल्या, तथापि, जुलै पासून पैसे काढण्याची लोकांची प्रवृत्ति मर्यादित झाली. १९३९–४० सालाच्या मानानें १९४०–४१ मधील परत दिलेल्या लोकांच्या ठेवींचा आकडा थोडासा कमीच होता. युद्ध परिस्थितीमुळें लोकांच्या मनाची झालेली चलबिचल गेल्या वर्षाच्या प्रारंभीं अल्पकालिक होती आणि सरकारी रोखे व नाणें बाजारांतील व्यवहार ह्यांवरचा जनतेचा विश्वास पुन्हां स्थिर झाला हें आतांपर्यंत दिलेल्या माहितीवरून ध्यानांत आलेंच असेल. ह्याच प्रकारचा अनुभव बँकांकडच्या ठेवी आणि चलनी नोटा ह्यांचे बाबतींत आला हें नमूद करणें आवश्यक आहे.

### बँकांचा अनुभव

कांहीं काळपर्यंत ठेवी परत करण्याचा ताण कांहीं बँकांवर पडला पण त्यांनीं यशस्वी रीतीनें ह्या परिस्थितीस तोंड दिलें आणि हा पैसा त्यांचेकडे पुन्हां परतला. युद्ध काळांत असे प्रसंग येणें अपरिहार्य आहे हें जाणून आपला पैसा होईल तितका तरता ठेवण्याचें धोरण बँकांनीं स्वीकारलें आहे ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर जेम्स टेलर, ह्यांनीं नुकतेंच समाधान व्यक्त केलें आहे. १९४० सालच्या जून अखेर शेड्यूल्ड ( रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या ) बँकांजवळील ठेवींची एकूण रक्कम सुमारें २५१ कोटि रुपये होती ती १९४१ च्या जून महिन्याचे अखेरीस ३०२ कोटि रुपये झाली. रिझर्व्ह बँकेकडे ह्या बँकांची रोकड शिल्लक असते तीहि गेल्या साली ९ कोटि रुपयांनीं वाढली. त्यांनीं दिलेल्या कर्जांत सुमारें १२ कोटि रुपयांची घट झाली. ह्या आकड्यांवरून असें दिसून येईल कीं नाणें बाजारांत पैशाचा पुरवठा भरपूर आहे. युद्ध परिस्थितींत चलनास वाढती मागणी असते आणि ह्यामुळें एकूण चलनी नोटांची किंमत १९३९–४० साल अखेर सुमारें २५९ कोटि रुपये होती, ती १९४०–४१ अखेर २९१ कोटि रुपयांपर्यंत चढली. एक रुपया किमतीच्या नोटा वाढत्या प्रमाणांत प्रचलित होत आहेत. त्यांनीं रुपयाच्या नाण्यांची जागा घेतली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांची १९४०–४१ मध्यें सुमारें ११४ कोटि रुपयांची विक्री झाली आणि त्यांवरील व्याजाचा दर सरासरीनें दरसाल दर शें. १२ आणे ९ पै इतकाच पडला. पूर्वीच्या सालीं १२० कोटी रुपयांचीं ट्रेझरी बिल्स विकलीं होतीं. तीं त्यांवरील सरासरीच्या व्याजाचा दर १ रु. १० आणे ३ पै इतका होता. बदलणाऱ्या युद्धपरिस्थितीशीं हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेचा मेळ कसा पद्धतशीर व यशस्वी रीतीनें घातला जात आहे त्याचीं भरपूर उदाहरणें आतांपर्यंत दिलेल्या माहितीमध्यें सांपडतील ह्यांत संशय नाहीं.

( संपूर्ण )

## लवादाचा कायदा

लेखक:—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, बी. ए. (ऑनर्स), एलएल्. बी.

(मागील अंकावरून समाप्त)

पंचानें दिलेल्या निर्णयासंबंधीं पक्षकारास निराळा दावा आणतां येत नाहीं. पंचानें दिलेला ठराव हा योग्य नाहीं, तो बेकायदा ठरवावा असा फक्त अर्जच कोर्टाकडे पक्षकारास करतां येतो. लवाद-निवाडा सकृद्दर्शनीं अपूर्ण असून एखादी उघड चूक निवाड्यामध्यें असेल किंवा पंचानें आपल्याकडे सोपविलेल्या बाबीपेक्षां जास्त गोष्टीबद्दल लवादानें निवाडा दिला असेल तर कोर्टास निवाड्यामध्यें दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणें लवादांनीं दिलेला निर्णय अपूर्ण असेल किंवा कांहीं बाबींवर निर्णय दिलाच नसेल तर कोर्टास निवाडा फेर-विचाराकरितां लवादाकडे परत पाठवितां येतो. लवादानें आपल्या कामांत गैरवर्तन केलें असेल किंवा लवादनिवाडा अयोग्य रीतीनें केला असेल तर सदर निवाडा कोर्टास अजिबात रद्द करतां येतो. साधारणपणें लवादापुढें काम कसें चालतें ह्याची रूपरेषा श्री. देशपांडे यांनीं आर्बिट्रेशन ॲक्ट ह्या पुस्तकांत पान १७ वर दिली आहे. येणेंप्रमाणें ह्या कायद्याचें स्थूलस्वरूप आहे.

लवादापुढें चालणाऱ्या कामास मुदतीचा कायदा लागू होतो असा स्पष्ट उल्लेख ह्या कायद्यामध्यें केला आहे. निवाडा कोर्टांत दाखल झाल्यावर त्या निवाड्यास अनुसरून कोर्ट आपला ठराव करतें व त्या ठरावानुसार हुकूमनामा होतो. ज्या कोर्टांत फिर्याद चालली असती त्याच कोर्टांत निवाडा दाखल करावयाचा आहे.

उभय पक्षकारांनीं आपणामध्यें असलेला अगर केव्हांहि पुढें होणारा तंटा लवादानें मिटवावा अशा तऱ्हेचा करार तंटा उत्पन्न होण्यापूर्वींहि पक्षकारांना करतां येतो व अशा उभय पक्षकारांचा करार लेखी झाला पाहिजे व पुढें ज्यावेळेस तंटा उपस्थित होईल त्यावेळीं तंट्याचें प्रकरण लवादाकडे सोपवावयाचें असतें. हा जो पक्षकारांमध्यें लेखी करार होतो त्याला राजीनामा म्हणतात. हल्लीं बँका अनेक व्यापाऱ्यास रकमा कर्जाऊ देतात अगर त्यांचीं देवघेवीचीं खातीं ठेवतात. असें खातें ठेवण्याचे वेळींच किंवा रकम कर्जाऊ देण्याचे वेळींच दोघांमध्यें तंट्याचा प्रसंग आल्यास त्यांचा निकाल पंचामार्फत करावयाचा त्याकरितां कोर्टांत जावयाचें नाहीं असा करार करून ठेवणें योग्य आहे. कारण ह्यावेळीं ऋणको गरजू असतो व असा करार करून तंट्याचा निर्णय करून घेणें त्याचे दृष्टीनेंहि श्रेयस्कर असतें, त्यामुळें पुष्कळ वेळ व खर्च वाचतो. साधारणपणें खालील प्रकारचा करार ऊर्फ राजीनामा उभय पक्षकारांनीं लिहून ठेवावा:—

१. एकपक्षी सावकार अगर कोणी इसम व दुसरेपक्षी ऋणको अगर दुसरा इसम यांच्या दरम्यान हल्लीं अस्तित्वांत असलेले किंवा पुढें उत्पन्न होणारे वाद किंवा तंटे यांचा खालीं लिहिल्याप्रमाणें निकाल करून घेण्यास आमची खुषी व कबुली आहे.

२. रा. (येथें लवादाचें नांव घालावें) यांनीं स्वतः अगर ते नेमतील त्या पंचांनीं निकाल करावा.

३. लवादपंचांकडून जो निवाडा होईल तो उभयतांस कबूल व मान्य आहे तसेच लवाद पंचायतीचे खर्चास व पंचास योग्य मेहेनताना देण्यास आमची कबुली आहे. हा राजीनामा स्वसंतोषानें लिहून दिला.

| साक्ष | सह्या |
|---|---|
| १................... | १................... |
| २................... | २................... |

याप्रमाणें कोणताहि व्यवहार करतेवेळींच असा राजीनामा करून घेतल्यास पुढें जिकीर होणार नाहीं. हल्लीं कोर्टामध्यें जे कज्जे चालू आहेत, त्यापैकीं फार थोड्या कज्ज्यामध्येंच अगदीं कायद्याच्या कलमांचा कीस काढून भांडणें भाग पडतें. पुष्कळच खटले मामुली स्वरुपाचे असून त्यांचा निकाल कोणत्याहि समंजस माणसास समता, न्यायबुद्धि व न्याय यांच्या तत्त्वास अनुसरून करणें अवघड नाहीं. त्यायोगें पक्षकारांचा पुष्कळच फायदा होईल ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. शिवाय लवादपंचास कायद्याच्या मुद्यासंबंधीं विचार करणें झाल्यास त्या कायद्याच्या मुद्यावरच पंचास कोर्टाकडून निर्णय मागण्याचा हक्क ह्या लवाद-कायद्यानें दिला आहे.

सरकारचा उद्देशहि लोकांनीं लवादामार्फत आपल्या तंट्यांचा निर्णय करून घ्यावा, असाच दिसतो. सहकारी संस्थांचें जाळें देशामध्यें हल्लीं फार पसरत आहे व बहुशः प्रत्येक खेड्यांत सहकारी को-ऑपरेटिव्ह सोसायटी असतेच; ती आपल्या सभासदास कर्जाऊ रकमा देते. सदर सोसायटीस आपल्या रकमेच्या वसुलीबद्दल कोर्टाकडे जातांच येत नाहीं. सोसायटीनें आपल्यामधील व सभासदांमधील तंटे लवादामार्फतच चालविले पाहिजेत. त्याबाबतींत दिवाणी कोर्टास अजिबात अधिकार नाहीं असा स्पष्ट निर्देश सहकारी संस्थेसंबंधीं जो कायदा आहे त्यामध्यें आहे, त्यामुळें गरीब रयतेचा पुष्कळच फायदा आहे. नामदार हायकोर्ट जज्जांचेंहि मत लोकांनीं आपले तंटे लवादामार्फत निकालांत आणावेत, असाच दिसतो; कारण Civil Court Manual सहावें प्रकरण लवाद (Arbitration) असें आहे. त्यामध्यें म्हटलें आहे. "In their Lordship's opinion while the substitution of arbitration by private bodies or persons for expensive and protracted litigation in the Civil Courts is in itself not only reasonable but desirable." ह्याप्रमाणें लवादामार्फत तंट्याचा निकाल करून घेणें हें श्रेयस्कर आहे, ह्याबद्दल आतां एकमत आहे व पूर्वीच्या कायद्यामध्यें असलेलीं वैगुण्यें दूर करून सर्व हिंदुस्थानास लागू होणारा लवाद-कायदा सरकारनें प्रसृत केला आहे. त्याचें ज्ञान सर्व लोकांस असणें अत्यंत जरूर आहे. ('न्यायबोध'वरून)

---

## विटें मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेचे पटावर १४७ सभासद असून त्यांनीं ७,२४० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. २० हजार रुपये भांडवल जमल्याखेरीज बँकेचा व्यवहार पुढें पूर्ववत् चालू शकणार नाहीं, असा नियम झाल्यामुळें बँक हें नांव राखून धंदा करतां येईल किंवा नाहीं ह्याची शंका वाटूं लागली. तथापि, पुरेसें भांडवल जमविण्याचा भागीदारांचा प्रयत्न चालू असून जरूर तेवढें भांडवल जमेल, असा विश्वास वाटूं लागला आहे. बँकेचे एकूण फंडस ११८५ रुपयांचे असून ४१½ हजारांच्या तिचेकडे ठेवी आहेत. बँकेनें ६ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतवले असून २५½ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. वर्षा अखेर बँकेस ५३८ रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यास ३०२ रुपये लागतील. भाग भांडवल वाढल्यावर त्यावरील डिव्हिडंडची रकमहि वाढेल, ह्या दृष्टीनें नफावाटणीकडे बँकेचें व्यवस्थापक मंडळ लक्ष पुरवीलच.

## कातडीं कमाविण्याचा धंदा

### निजाम सरकारची पंचवार्षिक सुधारणा योजना

वरील पंचवार्षिक सुधारणेची योजना करण्यांत आल्याकारणानें आतांपावेतों संस्थानांतील प्राचीन पद्धतीनें करण्यांत येणाऱ्या कातडीं कमाविण्याच्या धंद्यास चांगलीच चालना मिळाली आहे. निजाम सरकारनें या योजनेस मंजुरी दिली असून तीस एक लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. यापैकीं निमी रक्कम वरचेवर खर्च पडणार नाहीं. या योजनेप्रमाणें सोईस्कर अशा केन्द्रांच्या ठिकाणीं कातडीं कमाविण्यासाठी पंधरा शेड्स ( छपरें ) उभारण्यांत येणार आहेत. येथें या धंद्यांत काम करणारे चांभार व ढोर यांना तज्ज्ञ कामगारांकडून वरील धंद्याचें शिक्षण देण्यांत येईल. कातडीं कमाविणारा एक इन्स्पेक्टर, कातडीं सोलून काढणारा, हातानें तासकाम करणारा, ढोर व मोची इतके लोक वरील तज्ज्ञ मंडळींत राहतील. कातडीं सोलून काढणें, तीं वाळवून खारवून ठेवणें, नंतर तीं कमाविणें व त्यांचे जिन्नस बनविणें या सर्व गोष्टी शास्त्रीय पद्धतीनें वरील मंडळी करतील.

गुरेंढोरें आणि मेंढरें हीं हिंदुस्थानांतील इतर भागांतील खेडुतांप्रमाणें, हैद्राबाद ग्रामीण जनतेचीहि महत्त्वाची मालमत्ता आहे हें समजलें म्हणजे वरील योजनेचें महत्त्व पटेल. याचा परिणाम असा होईल कीं, कातडीं सोलून काढणें व तीं कमाविण्याच्या सध्याच्या पद्धतींत सुधारणा होऊन, त्यांची किंमत वाढल्यास खेडुतांचें उत्पन्न साहजिकच जास्त वाढेल. कातडीं वाळवून खारविणें, कमाविणें व त्यांची विक्री करणें या सर्वांच्या दृष्टीनें संस्थानांतल्या या धंद्याच्या स्थितीची पहाणी थोड्या दिवसांपूर्वींच करण्यांत आली. या निरीक्षणांत असें आढळून आलें कीं दरवर्षी १६,५०,००० कातडीं तयार होतात व यांपैकीं $\frac{१}{१०}$ कातडीं हत्या केलेल्या जनावरांचीं असून बाकीचीं मृत जनावरांचीं असतात. वरील पाहणी करण्यानें हें निदर्शनास आलें कीं, कातडीं सोलून काढणें व कमाविणें या दोन्हींची पद्धत अगदीं पुरातन काळाची असल्यानें त्यांची किंमत त्यामुळें कमी येते. प्रतिवर्षी एकंदर २०,००० कमावलेल्या कातड्यांपेक्षां जास्त कातडीं निर्यात होत नव्हतीं. याचें मुख्य कारण हें होतें कीं, यांत फार हलक्या दर्जाचीं कातडीं असत. मेलेल्या जनावरांच्या कातड्यांचा मोठा हिस्सा खेड्यांतील चांभार व ढोर लोक कमावीत असत असें आढळून आलें व या तयार झालेल्या कातड्यांचे चप्पल, सोंड, मोटा, वगैरे किरकोळ प्रकारचे जिन्नस ग्रामीण विभागांत तयार करण्यांत येत आहेत.

### योजना

अगोदर दर्शविल्याप्रमाणें, सरकारी योजनेतहत या धंद्याच्या पुढील सर्व अवस्थेंत सुधारणा घडवून आणावयाची आहे:—

( १ ) कातडीं सोलून काढणें व तीं वाळवून खारविणें,
( २ ) कातडीं कमाविणें आणि,
( ३ ) त्यांचा माल तयार करणें.

सध्यां स्थापन करण्यांत येणारे कातडीं कमाविण्याचे आदर्श कारखाने व त्यांचें मार्गदर्शन, आणि त्यांवर नियंत्रण करण्याचें काम या बाबतींत नेमलेले अधिकारी करतील. नोकर मंडळी व कातडीं कमाविणारे लोक यांच्या मदतीनें सदरील ऑफिसर कातडीं सोलणें, तीं वाळवून खारविणें व कमाविणें हीं कामें योग्य रीतीनें करण्यांत यावींत म्हणून प्रचार करतील. जिल्ह्यांतून या धंद्यासंबंधींचें आणखी निरीक्षण करून कारखान्यांच्या मालकांनाहि ते सल्ला देतील.

कातडीं सोलून काढण्याच्या विभागाची व्यवस्था करण्यांत आली आहे. कातडीं सोलण्याचें काम करणारा मनुष्य आपलें काम या ऑफिसरच्या देखरेखीखालीं करील, व तो आंखलेल्या कार्यक्रमाप्रमाणें शहर व खेड्यांतील कारखान्यांना भेट देऊन कातडीं न फाडतां तीं सोलून काढण्याची योग्य पद्धति त्यांना शिकवील. कातडीं वाळविण्याची व खारविण्याची आधुनिक पद्धतहि हा मनुष्य त्यांना शिकवील.

तिसऱ्या विभागांत कातड्यांचा माल तयार करण्यांत येईल. सध्यां संस्थानांत तयार होणारा कातड्याचा माल, संयुक्तप्रांत, मद्रास नि मुंबई येथें तयार होणाऱ्या मालाशीं तुलना केल्यास, अतिशय हलक्या दर्जाचा आहे. प्रयोग म्हणून कातडीं कमाविण्याच्या एका विभागास 'मोची' विभाग जोडला जाईल व एक सुशिक्षित व या धंद्यांत शिकून पारंगत झालेला व ज्यांस त्यासंबंधीं प्रत्यक्ष अनुभव आहे अशा गृहस्थाच्या देखरेखीखालीं हा मोची-विभाग काम करील. कातडीं कमाविणें, व चप्पल, जोडे, सूटकेसेस ( कपडे ठेवण्याच्या पेट्या ) इ. कातड्याचा माल तयार करण्याबाबत तो खेडुतांना शिक्षण देईल.

### आणखी प्रोत्साहन

चांभार व ढोर लोकांनीं सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करावा म्हणून त्यांचें मन वळविण्यासाठी प्रथम त्यांना सरकारी कातडीं कमाविण्याच्या कारखान्यांत मजुरी देऊन कातडीं कमाविण्याचें काम करण्यास सांगण्यांत येईल. या योजनेप्रमाणें देण्यांत येणाऱ्या पैशांतून लागणारीं कातडीं खरेदी करावयाचीं आहेत. अशा तऱ्हेनें ३-४ महिने काम शिकल्यानंतर त्यांना आपल्या स्वतःच्या मालकीचीं कातडीं कमाविण्यासाठीं या कारखान्यांत आणण्याची परवानगी दिली जाईल व तज्ज्ञ कातडीं कमाविणाऱ्यांच्या देखरेखीखालीं ती स्वखर्चानें त्यांना तेथें कमावितां येतील.

### प्रचारक पथकें

आशिक्षित चांभार व ढोर यांना शक्य तितक्या लवकर कातडीं कमाविण्याच्या सुधारलेल्या पद्धतीचें महत्त्व समजावें या मुख्य उद्देशानें वरील कामांचा कार्यक्रम हातीं घेण्यांत येईल. या योजनेप्रमाणें स्थापण्यांत येणारें कातडीं कमाविण्याचें केंद्र जवळजवळ एक वर्षपावेतों एकाच ठिकाणीं काम करील. जर ही सुधारलेली पद्धत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांची संख्या जास्त वाढेल तर वरील मुदत दोन वर्षांपर्यंतहि वाढविण्यांत येईल. उभारण्यांत येणाऱ्या पांच पथकांपैकीं प्रत्येक पथक पुढील पांच वर्षांच्या अवधींत तीन केंद्रांच्या ठिकाणीं काम करील अशी अपेक्षा आहे. म्हणून प्रत्येक पथकाकरितां तीन 'शेड्स' उभारण्याची या योजनेनुसार व्यवस्था केली जाईल. या योजनेनुसार उभारण्यांत येणाऱ्या वरील पांच पथकांपैकीं तेलंगण विभागांत २ आणि मराठवाडा नि कर्नाटक विभागांत अनुक्रमें २ व १ अशीं पथकें स्थापण्यांत यावयाचीं आहेत.

### आणखी एक अंग

या योजनेचें तितकेंच महत्त्वाचें दुसरें अंग हें आहे कीं, प्रत्येक केंद्राच्या ठिकाणीं जर चांभार व ढोर लोकांची पुरेशी संख्या

ही नवीन पद्धत शिकून तयार होईल तर तेथील कुंड्यासह असलेली 'शेड्'त्यांच्या स्वाधीन करण्यांत येईल. नंतर त्यांचें उत्पन्न जसजसें वाढेल त्याप्रमाणें कातडीं कमाविणाऱ्या लोकांचा सहकार संघ स्थापणें व या संघाच्या प्रत्येक सभासदाकडून 'शेड्' व कुंड्यांचा उपयोग केल्याबद्दल भाडें वसूल करणें आणि वरील 'शेड्' नि कुंड्या व्यवस्थित ठेवण्याकडे हें भाडें खर्चिणें या सर्व गोष्टी करण्याचें योजिलें आहे.

### मुख्य पदार्थांचे अंगभूत पदार्थ

मेलेल्या जनावरांचा आणखी उपयोग करण्याची संभाव्यता आहे. याचा येथें उल्लेख केला पाहिजे. मांसापासून शिरस, आणि रोजच्या उपयोगाचे जिन्नस व हाडांचें खत मोठ्या प्रमाणावर तयार करतां येणें शक्य आहे. कातडीं कमाविण्याचा धंदा ज्यांच्यामध्यें मुख्यतः केन्द्रित झाला आहे अशा हरिजन वर्गाचें अधिक मिळकतीचें साधन म्हणून, योग्य वेळीं, वरील माल तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत येईल.

### ग्रामोद्धाराच्या कक्षेंत येणाऱ्या खेड्यांसाठी योजना

याबरोबरच मुख्य योजनेप्रमाणें उभारण्यांत येणाऱ्या आदर्श कातडीं कमाविण्याच्या 'शेड्स' पासून ज्या ग्रामोद्धाराच्या कक्षेंत येणाऱ्या खेड्यांचा प्रत्यक्ष फायदा होणें अशक्य आहे, अशांकरितां त्यासंबंधींच्या खास कामासाठी कांहीं सूचना सरकारकडे सादर केल्या आहेत. सुरवातीस पटंचरू ग्रामीण केन्द्राजवळील या कामासाठी एका खेड्याची निवड करणें व तेथें शिकून तयार झालेला एखादा चांभार किंवा ढोर दरमहा ५० रुपयांवर नेमणें हा वरील कामाचा उद्देश आहे. ग्रामोद्धाराचें कार्य करण्यासाठी योजिलेल्या तीन अथवा चार निवडक खेड्यांत कातडीं कमाविण्याच्या प्रत्येक अवस्थेंतील आधुनिक पद्धत दाखविणें हें या नोकराचें काम राहील.

## मिरज स्टेट बँक, लि., मिरज

(वार्षिक सभा: २१-९-४१.)

मिरज स्टेट बँक लि. चें खपलेल्या भागांचें भांडवल १ लक्ष रुपये व मागणी केलेल्या भागांचें वसूल झालेलें भांडवल २० हजार रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत २० हजार रुपये, बिल्डिंग फंडांत ३,१०० रुपये, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत २५ हजार रुपये, डिव्हिडंड तरतूद फंडांत २,२०० रुपये, बुडीत व संशयित येणीं फंडांत ६५½ हजार रुपये, ह्याप्रमाणें रकमा आहेत व आतां त्यांत अनुक्रमें ५ हजार रुपये, ५०० रुपये, १ हजार रुपये, ५०० रुपये व ९½ हजार रुपये ह्याप्रमाणें भर पडणार आहे. वरील आकड्यांवरून बँकेच्या भक्कमपणाची कल्पना येईल. बँकेकडील ठेवींची रक्कम १७ लक्ष, ६३ हजार रुपये भरते. म्हणजे गेल्या दोन वर्षांत ठेवींची रक्कम ६ लक्ष रुपयांनीं वाढली आहे. मुख्य कचेरी, शाखा व इतर बँका ह्यांत ५ लक्ष रुपये असून, ५ लक्ष, ४८ हजार रुपये सरकारी कर्जरोखे व भाग ह्यांत गुंतविलेले आहेत. बँकेच्या मालकीच्या रोख्यांची ताळेबंदांतील किंमत त्यांस पडलेल्या किंमतीपेक्षा १३,१३१ रुपयांनीं जास्त आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेनें एकूण ८ लक्ष ६४ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, त्यापैकी १ लक्ष, ४०हजार सोनें गहाणावर, ४ लक्ष, ८ हजार माल गहाणावर, ९० हजार सिक्युरिटीजवर व ९६ हजार स्थावर मिळकत गहाणावर, दिलेले आहेत. "रामप्रताप हरिचंद ह्या पेढीकडे बॅलन्स शीटमध्यें जें संशयित येणें दाखवलें आहे, त्याबद्दल अलाहिदा माजी मॅनेजर यांचेवर ७६,०५८-८-०चा दावा केला असून पुढील तजवीज चालू आहे." डायरेक्टरांनीं भागीदारांस १२% डिव्हिडंड देण्याबद्दल सुचविलें आहे, त्यासाठी २,४०० रुपये लागतील. बँकेचे फंड मजबूत असून डिव्हिडंडचा दर मोठा असला तरी तें देण्यासाठी रकम मोठी लागत नसल्याकारणानें, नफ्यांतून वेगवेगळ्या फंडांत मोठ्या रकमा टाकणें शक्य होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. बँकेची प्रगति चांगली होत आहे. श्री. विष्णु पांडुरंग बेडेकर, बी. एससी., बी. ई. हे संस्थानतर्फे चेअरमन असून श्री. लक्ष्मण गणेश मराठे, जी. डी. ए. हे मॅनेजर आहेत.

## अर्बन को. बँक लि., सांगली

(वार्षिक सभा: २९-८-४१)

वरील बँकेचें वसूल भांडवल ३३,४२५ रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड २,७५८ रुपयांचा आहे व इतर फंडांत २,४०४ रुपये आहेत. बँकेकडे २ लक्ष, ८८ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. रोख व इतर बँकांत मिळून बँकेचे १ लक्ष, ७९ हजार रुपये आहेत व तिनें डिबेंचर्स व भाग ह्यांत २६½ हजार रुपये गुंतवले आहेत. बँकेनें अंगावर ६४½ हजार रुपये व तारणावर ६६½ हजार रुपये दिलेले आहेत. सालअखेर थकबाकी १३,१०४ रुपये आहे. "थकबाकी बुडीत होण्याचा संभव नाहीं. भरपूर तारण व लायक जामीन आहेत." नफावाटणीसाठी ३,०२२ रुपये आले, त्यांतून ६¼% डिव्हिडंडसाठी १,८३६ रुपये मंजूर करण्यांत आले व बाकीची रकम रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आली. बँकेची प्रगति होत असल्याचें रिपोर्टावरून दिसून येतें.

## मराठा चेंबरची त्रैमासिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजूची चालू वर्षाची पहिली सर्वसाधारण त्रैमासिक सभा रविवार ता. ३१ ऑगस्ट रोजीं भरली होती. त्यावेळीं चेंबरचे अध्यक्ष, श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांनीं चेंबरच्या तीन महिन्यांतील कामाचें सिंहावलोकन केलें व अवर्षणामुळें फार मोठा दुष्काळ पडण्याचा संभव आहे, त्याच्या आपत्तीची तीव्रता कमी करण्याचा आतांपासूनच प्रयत्न केला पाहिजे, असें ते म्हणाले. पेट्रोल नियंत्रणामुळें होणाऱ्या अडचणींचाहि त्यांनीं उल्लेख केला. श्री. मा. रा. जोशी ह्यांनीं टेलिफोनच्या नवीन दरासंबंधीं चेंबरनें केलेल्या पत्रव्यवहाराविषयीं माहिती विचारली, ती चेंबरचे कार्यवाह, श्री. आ. रा. भट, ह्यांनीं दिली. श्री. न. गं. ञापटे ह्यांच्या इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीवरील निवडणुकीबद्दल त्यांचें हार्दिक अभिनंदन करणारा ठराव सभेनें मंजूर केला. चहापानानंतर सभेचें काम संपलें.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पुणें.

आमचे हेड–ऑफिस व शाखा–कचेऱ्यांमध्यें सेव्हिंग्ज बँकेंत ठेवलेल्या ठेवीवर हल्ली द. सा. द. शे. दीड टक्का दरानें व्याज देण्यांत येत असतें. परंतु तें ता. १-१०-१९४१ पासून एक टक्का दरानें देण्यांत येईल.

द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १११—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—२ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९५—१ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) — ... | ११५—० |
| ५% म्हैसूर क़र्ज (१९५५) ... — | १२६—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १४३—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११३—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ९% ... | ४७–१२ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १५८१—४ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०९—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १४१–१२ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २१७—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १७२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १७२१—४ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) ३½% ... ... | ८०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९७–०–० |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४८–१२ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २४–१४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. ... | ४७—८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४११५—० |
| टाटा आयर्न प्र. प्रे. (१५०) ६% ... ... | २१४—२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १४८—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३७२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ७ पै ... | ११९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १४६–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२—२—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–१४–० |


संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि.
विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं
लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
४ सहकार : किं. २ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील
इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें

संग्रह करा

कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट

पाचकवटी, पंचकोलासव

तसेंच

पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी

—: रक्तवर्धक :—

सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान–गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



मधुमेहावरील

औषध

तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७१ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.